# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ /( ३२२/ ०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(विद्या विभाग)

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५ फोन नंबर ०७१३२ - २२३३२३


गोंविग/ विद्या /क्र/ ३६८ /२०२२ दिनांक २०/०७/२०२३

## // परिपत्रक //

**संदर्भ** :- मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२/८०५६ दि. १३/०७/२०२३

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठातील विभाग प्रमुखांना याव्दारे सुचीत करण्यात येते की, शासन पत्र दि. १६ जुन, २०२३ अन्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंना विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये, आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविल्या जात असलेल्या महाविद्यालयामध्ये शासन निर्णय दि. २० एप्रिल, २०२३ व शासन निर्णय दि. १६ मे, २०२३ नुसार अंमलबजावणी करण्याचे कळविण्यात आलेले आहे. दि. २९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करण्याऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्ष पुर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये **दि. २४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह"** म्हणुन साजरा करण्याचे योजिले आहे.

या दिवशी तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शनपर व्याख्यान व खालील प्रमाणे उपक्रम/कार्यक्रम घेण्यात यावेत.

**१) स्पर्धा** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही संकल्पना घेऊन पध्दतीने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्हिडीओज, रिल्स यासारख्या स्पर्धा आयोजीत कराव्यात.

**२) जाणीव जागृती** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात ग्रंथालय/महाविद्यालयामध्ये प्रदर्शन आयोजीत करणे, रेडिओ, टेलिव्हीजनच्या माध्यमातुन चर्चा, मुलाखती आयोजीत करणे, अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिकांच्या संपादकांबरोबर बैठक आयोजीत करुन चर्चा घडवून आणणे. यु-टयुब आणि सोशल मिडियांच्या माध्यमाचा वापर करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरण सर्व संबधित घटकांपर्यंत पोहोचविणे. तसेच या माध्यमाचा वापर करुन विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे.

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठातील विभाग प्रमुखांनी वरीलप्रमाणे नमुद दिनांकानुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह आयोजीत करुन याबाबतचा अहवाल मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर यांचे कार्यालयाकडे पाठवावा व त्याची एक प्रत विद्यापीठाकडे सादर करावी.

**सहपत्र :- वरील प्रमाणे**

(डॉ.अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरु कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहीतीस्तव सविनय सादर.
३. सिस्टीम ॲनालिस्ट यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिदध करण्याची कार्यवाही घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/(१३६/२२)/विशि-१/भाग-२ /८०५६ दि. 13 JUL 2023

प्रति,

१.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे,
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने दि.२४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्याबाबत.

संदर्भ १. शासन निर्णय एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३/शिकाना दि..२० एप्रिल, २०२३
२. शासन निर्णय एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३/शिकाना दि..१६ मे, २०२३
३.संचालनालयाचे समक्रमांक दि.४ जुलै, २०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये कळविण्यात येते की, भारत सरकारने दि.२९ जुलै, २०२० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० जारी केले. महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या धोरणाचा अभ्यास करुन राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी डॉ.रघुनाथ माशेलकर, माजी महासंचालक, वैज्ञानिक आणि औद्योगिक परिषद, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली कार्यबल गट स्थापन करण्यात आला. सदर कार्यबल गटाने शासनास सादर केलेला अहवाल स्वीकृत करुन सदर अहवालातील शिफारसीनुसार ०६ उपसमित्यांचे गठन करण्यात आले.

त्याअनुषंगाने धोरण अंमलबजावणीत येणाऱ्या अडीअडचणी, समस्या इ.च्या निराकरणासाठी सुकाणू समितीचे गठन करण्यात आले.

शासन पत्र दि.१६ जून, २०२३ अन्वये राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंना विद्यापीठ विभाग, स्वायत्त महाविद्यालये, आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविल्या जात असलेल्या महाविद्यालयामध्ये शासन निर्णय दि.२० एप्रिल, २०२३ व शासन निर्णय दि.१६ मे, २०२३ नुसार अंमलबजावणी करण्याचे कळविण्यात आलेले आहे.

दि.२९ जुलै, २०२३ या दिवशी भारतीय शिक्षणामध्ये आमुलाग्र बदल करण्याऱ्या शैक्षणिक धोरणास तीन वर्षे पुर्ण होत असल्यामुळे या दिवसाचे औचित्य साधून राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये दि.२४-२९ जुलै, २०२३ या कालावधीत "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह" म्हणून साजरा करण्यांचे योजिले आहे.

या दिवशी आपल्या विद्यापीठामध्ये तसेच संलग्नित महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात सखोल ज्ञान असलेल्या तज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात यावे. तसेच खालील प्रमाणे उपक्रम/कार्यक्रम घेण्यात यावेत.

१ स्पर्धा- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ही संकल्पना घेऊन पध्दतीने पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्हिडीओज,रिल्स यासारख्या स्पर्धा आयोजित कराव्यात.

२.जाणीव जागृती- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात ग्रंथालय /महाविद्यालयामध्ये प्रदर्शन आयोजित करणे, रेडिओ, टेलिव्हीजनच्या माध्यमातून चर्चा, मुलाखती आयोजित करणे, अग्रगण्य वर्तमानपत्रे, मासिकांच्या संपादकांबरोबर बैठक आयोजित करुन चर्चा घडवून आणणे. यु-टयुब आणि सोशल मिडियांच्या माध्यमांचा वापर करुन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरण सर्व संबंधित घटकांपर्यंत पोहोचविणे. तसेच या माध्यमाचा वापर करुन विद्यार्थी, पालक शिक्षक यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करणे.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण दिवस साजरा करण्यासाठी आपल्या विभागातील अकृषि विद्यापीठांचे संबंधित अधिकारी तसेच सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची उपरोक्त नमूद उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी ऑनलाईन/ऑफलाईन बैठक घ्यावी. तसेच सदरील उपक्रमांचे यशस्वीपणे आयोजन केले जाईल याबाबत दक्षता घ्यावी. आयोजित केलेल्या उपक्रमाचा विभागनिहाय अहवाल सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी दि.०३ ऑगस्ट, २०२३ पर्यंत संचालनालयास खास दूतामार्फत हार्डकॉपीमध्ये दोन प्रतीत सादर करावा.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- माहितीस्तव सादर
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, सुकाणू समिती , राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

Scanned with OKEN Scanner